


महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ५, अंक २ | एप्रिल २०२४ (क्र.१७)


## अनुक्रमणिका


**संपादकीय** 3

नुकसानभरपाईच्या आकडेवारीत दडलेले प्रश्न

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्र 4

ताडोब्यातून कोलबेड मिथेन काढण्यासाठी पर्यावरण विभागाची मंजुरी अनावश्यक - नितीन गडकरी

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रात वाघांची संख्या स्थिरावली; बिबट्यांच्या संख्येत वाढ

ताडोब्यात वाघ बघण्याच्या घाईत अपघात; वाहनचालक व गाईडवर कारवाई

तानसा वन्यजीव अभयारण्य 5

तानसा अभयारण्यात प्रस्तावित गारगाई धरण बांधू नये - BNHS ची केंद्र सरकारला विनंती

नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र 6

नवेगाव नागझिऱ्यात पर्यटनाच्या सुविधांमध्ये वाढ करण्याच्या विभागीय आयुक्तांच्या सूचना

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्र 7

संवर्धन केंद्रात जन्मलेली दहा गिधाडे पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात सोडली

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात ५२ मगरी

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात २०२३ मध्ये वणव्याच्या फक्त तीन घटना

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू; राष्ट्रीय महामार्ग ४४ वर ग्रामस्थांचा 'रास्ता रोको'

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रातील गोल पहाडी परिसरात वनस्पतीच्या नव्या प्रजातीचा शोध

मुनिया संवर्धन राखीव क्षेत्र 9

मुनिया संवर्धन राखीव क्षेत्रात कोळ्याच्या ४६ प्रजातींची नोंद - वनाधिकाऱ्याचे संशोधन

मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्र 10

मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्राजवळून रेल्वेमार्गासाठी वन जमिनीचा प्रस्ताव केंद्राकडून तूर्तास परत

सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्र 10

चांदोली अभयारण्यालगतच्या परिसरात माणूस वन्यजीव संघर्षाच्या आठ गंभीर घटना

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान 11

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून ठाणे-बोरिवली बोगदा खोदण्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मंजुरी

**प्रादेशिक बातम्या**

राज्यव्यापी 12

पाच वर्षांत राज्यात २०२३ मध्ये सर्वात कमी वणवे- माहितीच्या अधिकाराद्वारे मिळाली आकडेवारी

राज्यात वन्यजीव 'वन हेल्थ' केंद्र उभारण्यासाठी 'MAFSU'कडून ३० कोटी रुपयांचा प्रस्ताव

सर्व व्याघ्र राखीव क्षेत्रांतील व्याघ्र संवर्धन संस्थांसाठी ३६ कोटी ७९ लाख रुपयांची वार्षिक तरतूद

वनरक्षक पदभरतीच्या नागपुरातील शारीरिक चाचणीच्या वेळी अव्यवस्थेचा उमेदवारांचा आरोप

राज्यात माणूस वन्यजीव संघर्षापोटी २०२३-२४ मध्ये १३ कोटी ६८ लाख रुपयांची भरपाई
दहा वर्षांत महाराष्ट्र वन विभागाकडून माणूस वन्यजीव संघर्षांप्रसंगी सुमारे ४५० कोटींची भरपाई
विदर्भ 16
विदर्भातील जंगलांमुळे सिंचन प्रकल्प रखडतात - राज्याच्या मुख्य सचिवांचे न्यायालयात शपथपत्र
कमलापुरातील हत्ती पेंचमध्ये नेण्याचा बेत तूर्तास रद्द
चंद्रपुरात आंतरराष्ट्रीय सफारीचे नियोजन; ताडोबा महोत्सवात वन मंत्र्यांची घोषणा
पश्चिम महाराष्ट्र 17
राज्यातील पहिली वन्यजीव न्यायवैद्यक प्रयोगशाळा पुण्यात प्रस्तावित; जागासुद्धा निश्चित
जागतिक वन्यजीव दिवसाचे औचित्य साधून सांगली वन विभागाची डिजिटल उपकरणांमध्ये गुंतवणूक
कोकण 18
रत्नागिरी जिल्ह्यात १८ वर्षांत वन्य प्राण्यांचे २ हजारांपेक्षा जास्त व्यक्तींवर हल्ले
रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवर यंदा कासवांच्या अंड्यांच्या संख्येत ३ हजारांची वाढ
माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त 20
**राष्ट्रीय बातम्या** 21
देशात बिबट्यांच्या संख्येत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर; राज्यातील ७५% बिबटे संरक्षित क्षेत्राबाहेर
यंदा मार्च अखेरीस देशात किमान ६०० वणवे - **FSI**
**आंतरराष्ट्रीय बातम्या** 22
वन्यजीव गुन्ह्यांच्या तपासासाठी भारतासह पाच आशियाई देश एकत्र येणार
**थोडक्यात पण महत्त्वाचे** 24
निवडणुका, मतदार आणि वन्यजीव वगैरे

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**
**खंड ५, अंक २, एप्रिल २०२४ (क्र. १७)**
संपादकः रेश्मा जठार
सहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया
सहाय्यकः राधिका अघोर
शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio
प्रकाशकः कल्पवृक्ष
**संपादकीय पत्ता:**C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.
**दूरभाष/फॅक्सः** ०२० २५६५४२३९ **ई मेल:**marathipaupdate@gmail.com
**संकेतस्थळ:**https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/
***

टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य
**Duleep Matthai Nature Conservation Trust**
C/o **Foundation for Ecological Security** http://fes.org.in/
**Paul Hamlyn Foundation**
आणि
**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**
***

## संपादकीय

### नुकसानभरपाईच्या आकडेवारीत दडलेले प्रश्न

माणूस वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये गेल्या दशकभरात एकट्या महाराष्ट्रात वन विभागाने थोडीथोडकी नव्हे तर तब्बल ४५० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम नुकसानभरपाईदाखल दिली. वन्य प्राण्यांमुळे ज्या माणसांचे जीव गेले त्यांच्या कुटुंबाला, जखमी माणसांना, ज्यांच्या पाळीव जनावरांची हानी झाली अशा पशुपालकांना आणि ज्यांच्या पिकांचे नुकसान झाले अशा शेतकऱ्यांना. ज्यांच्या जीवाची, उपजीविकेच्या साधनाची हानी झाली त्यांना भरपाईसाठी पुरेशी आर्थिक मदत देणे आवश्यक आहे, हे खरे. मात्र, माणूस वन्यजीव संघर्षाची समस्या केवळ आर्थिक भरपाई देऊन सुटणारी नाही; किंबहुना, आर्थिक मदत हा प्रथमोपचारासारखा तात्पुरता उपाय आहे. याची जाणीव प्रस्तुत अंकातील वृत्तांकन पुन्हा एकदा करून देत आहे.

एकीकडे माणूस वन्यजीव संघर्षाच्या घटना आणि आर्थिक नुकसानभरपाईच्या वन विभागाच्या आकडेवारीच्या बातम्या; तर दुसरीकडे वन्य अधिवासाच्या ऱ्हासाला गती देणाऱ्या निर्णयांविषयीच्या बातम्या; जसे की राज्यातील महत्वाचा व्याघ्र अधिवास असलेल्या ताडोब्याच्या जंगलातून कोलबेड मिथेन काढण्यासाठी पर्यावरण विभागाची मंजुरी अनावश्यक ठरवण्याचा केंद्राचा निर्णय, जंगलांमुळे सिंचन प्रकल्प रखडतात अशी राज्य सरकारची शपथपत्रात मांडलेली ठोस भूमिका. हे वृत्तांकन आपल्या धोरणकर्त्यांच्या, सरकारच्या उक्ती आणि कृतीतील विरोधाभास अधोरेखित करते. प्रस्तुत अंकातील 'थोडक्यात पण महत्त्वाचे' सदरातही हा मुद्दा मांडला आहे.

वन्यजीवांमुळे होणाऱ्या नुकसानभरपाईदाखल कोट्यवधी रुपये वाटण्याची क्षमता आपल्या अर्थव्यवस्थेत आहे. तेव्हा, उरल्यासुरल्या वन्य अधिवासावरही अतिक्रमण करू आणि माणूस वन्यजीव संघर्ष उद्भवला की आर्थिक मलमपट्टी करू, असे अलिखित धोरण असल्याची व या संघर्षावर कायम स्वरुपी तोडगा काढण्याबाबत राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाची ही ग्वाही आहे.

माणूस आणि वन्यजीव संघर्षातील नुकसानभरपाईची आकडेवारी माणसाच्या झालेल्या नुकसानाकडे लक्ष वेधते. मात्र, संघर्षाच्या त्या हजारो घटनांमध्ये अजाणता भागीदार व्हावे लागलेल्या वन्य प्राण्यांचे काय झाले, त्याची माहिती करून घेण्याची गरज आपल्याला वाटली नाही. माहितीच्या अधिकारांतर्गत विचारलेल्या प्रश्नांच्या निमित्ताने पुनश्च आपली मनुष्यकेंद्रीत मनोवृत्ती उघड झाली असे म्हणावे की सर्वात बुद्धिमान म्हणवून घेणाऱ्या मनुष्यजातीला स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठीसुद्धा किंबहुना त्यासाठीच, वन्य अधिवास राखणे गरजेचे असल्याची जाण नाही, असे म्हणावे?

वन्य प्राण्यांची नसबंदी करणे किंवा त्यांचे स्थलांतरण करणे हेही माणूस वन्यजीव संघर्षावरील उपाय नव्हेत. वन्य प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचे यश हे कोणती प्रजाती, तिची संख्या किती, लिंगभेद गुणोत्तर, वयोमान, प्रजातीच्या संख्येत वयोगटाचे प्रमाण, त्या प्रजातीच्या संख्यावाढीचा दर आदी विविध घटकांवर अवलंबून असते. याकडे तज्ञ लक्ष वेधून घेत आहेत. ही झाली वैज्ञानिक बाब. आता, या समस्येची नैतिक बाजू पाहू.

दोनतीन दशकांपूर्वी आपण लक्षात घेतले की वाघाचे अस्तित्व राखणे आपल्या हिताचे आहे. हे ठरवल्यावर वाघांची संख्या वाढवण्यासाठी आपण उपाययोजना केल्या. वाघांची संख्या वाढल्यावर त्या यशाचे डांगोरे आपण जगासमोर पिटत आहोत. त्याचवेळी वाघांच्या वाढलेल्या संख्येमुळे काही प्रदेशांत माणूस वाघ यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे. वाघाचा अधिवास असलेल्या जंगलालगतच्या गावांमधील मोठी लोकसंख्या दररोज जीव मुठीत घेऊन जगू लागली आहे. त्यामुळे आपण प्रयत्नपूर्वक वाढवलेली वाघांची संख्या कमी करण्याबाबत चर्चेचा प्रसंग उद्भवला आहे. आता यावर संतुलित उपाययोजना करण्याचे

आव्हान आपण कसे पेलतो त्यावर वन्यजीवांचे व पर्यायाने मनुष्यजातीचे भवितव्य अवलंबून आहे.

***

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्र

**ताडोब्यातून कोलबेड मिथेन काढण्यासाठी पर्यावरण विभागाची मंजुरी अनावश्यक - नितीन गडकरी**

ताडोबा जंगल परिसरात कोलबेड मिथेनचा मोठा साठा आहे. ते काढून घेण्याचा विचार सुरू असून त्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी गरजेची नाही असा निर्णय घेतला आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. जानेवारी अखेरीस नागपूरमध्ये झालेल्या खासदार औद्योगिक महोत्सवानिमित्त आयोजित चर्चेत गडकरी बोलत होते.

कोलबेड मिथेन हा नैसर्गिक वायूचा स्त्रोत आहे. कोळशावर एका विशिष्ट दबावाखाली प्रक्रिया केल्यानंतर त्याचे उत्सर्जन होते. भारताच्या विविध राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात याचे साठे आहेत. चंद्रपूर जिल्ह्याच्या ३३१ चौ. किमी भागात ३७ अब्ज घनमीटर तर गडचिरोलीच्या ७०९ चौ. किमी परिसरात ४७ अब्ज घनमीटर साठे असल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** – ‘ताडोबाच्या जंगलातून ‘कोलबेड मिथेन’ काढण्याचा विचार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती’, *www.loksatta.com*, २८.०१.२०२४.

**ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रात वाघांची संख्या स्थिरावली; बिबट्यांच्या संख्येत वाढ**

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रात गेल्या काही वर्षांत वाघांची संख्या स्थिरावली असून बिबट्यांची संख्या वाढली आहे. ‘वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया’च्या मदतीने ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रात केल्या जाणाऱ्या वार्षिक प्राणिगणनेत २०१० मध्ये १७ वाघांची नोंद झाली होती. त्यानंतर व्याघ्र राखीवच्या क्षेत्रात बफर क्षेत्राची भर पडल्यामुळे ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्राची व्याप्ती वाढली. वाढलेल्या भागासह ताडोबा अंधारी क्षेत्रात २०१२ साली ४९ वाघांची नोंद झाली. तेव्हापासून २०१५ पर्यंत ताडोबातील व्याघ्रसंख्येत उत्तरोत्तर वाढ होत असल्याचे दिसून आले. गेल्या ४-५ वर्षांत मात्र ही संख्या स्थिरावताना दिसत आहे (सोबत दिलेली आकडेवारी पाहा).

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रातील आकडेवारी

| वर्ष | वाघ | बिबटे |
|---|---|---|
| २०१९ | ११५ | १०६ |
| २०२० | ८५ | १०६ |
| २०२१ | ८६ | ११८ |
| २०२२ | ८७ | १२८ |

ताडोब्यात अद्याप प्रौढ न झालेल्या वाघांची संख्या सुमारे ३०, बछड्यांची संख्या किमान २५ आहे. सर्व मिळून इथे एकूण ८७ वाघ असल्याचे २०२२ च्या व्याघ्रगणनेत आढळले आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रातील अनेक गावांचे गेल्या पाच वर्षांत प्रकल्प क्षेत्राबाहेर स्थलांतरण करण्यात आले. त्यामुळे मोकळ्या झालेल्या जमिनीवर ताडोबातील वन्यजीवांची संख्या वाढू लागल्याचे दिसून आले आहे.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ४ अंक २, खंड ५ अंक १)

**स्रोत** – पंकज मोहरीर. ‘वाघांपेक्षा बिबट अधिक! ताडोब्यात संवर्धन व सुरक्षा ठरले महत्त्वाचे, प्रकल्पाला २८ वर्षे पूर्ण’, *https://marathi.indiatimes.com*, २३.०२.२०२४.

**ताडोब्यात वाघ बघण्याच्या घाईत अपघात; वाहनचालक व गाईडवर कारवाई**

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रात वाघ बघण्याच्या घाईत वेगाने जिप्सी चालवून झाडाला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन पर्यटक जखमी झाले. ही घटना ३१ जानेवारी रोजी दुपारच्या सत्रात देवाडा – आगरझरी परीसरात घडली. जखमी झालेले पर्यटक चंद्रपूर शहरातील रहिवासी आहेत.

या प्रकरणी ताडोबा व्यवस्थापनाने जिप्सी चालक सूरज ढोक याचा परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित केला आहे. गाईड अर्जुन कुमरे याच्यावर एक महिन्यासाठी कारवाई केली आहे. ताडोबात वाघ बघण्यासाठी पर्यटकांमध्ये जोरदार स्पर्धा असते. जिप्सी चालक आणि गाईड यांना वारंवार सूचना देऊन देखील नियम पाळले जात नाहीत. त्यामुळे आता नियम तोडणाऱ्यांवर ताडोबा प्रशासन कठोर कारवाई करणार आहे, असे वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** – 'चंद्रपूर : वाघ बघण्यासाठी वेग वाढवला, जिप्सी धडकली झाडाला…' , *www.loksatta.com*, ०१.०२.२०२४.

## तानसा वन्यजीव अभयारण्य

**तानसा अभयारण्यात प्रस्तावित गारगाई धरण बांधू नये - BNHS ची केंद्र सरकारला विनंती**

गारगाई धरणाच्या बांधकामामुळे पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील ८३९.०२ हेक्टर जंगल क्षेत्र पाण्याखाली जाणार आहे. तानसा अभयारण्यात या धरणाचे बांधकाम केले तर सह्याद्रीचा वायव्य भागासह अभयारण्यातील वन्यजीवांच्या मुक्त संचारावर मर्यादा येतील, इथल्या परिसंस्थेची हानी होईल. त्यामुळे गारगाई धरण बांधू नये, असे 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (BNHS) चे संचालक किशोर रिठे यांनी केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय आणि राष्ट्रीय वन्यजीव मंडळ (नॅशनल बोर्ड फॉर वाइल्डलाईफ) च्या स्थायी समितीच्या अध्यक्षांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

BNHS ने २०१५-१६ मध्ये मुंबई महानगरपालिकेच्या वतीने गारगाई धरण प्रकल्पस्थळाचा अभ्यास केला. त्यामध्ये वनस्पती, बुरशी यांसह इथल्या अधिवासातील पृष्ठवंशीय व अपृष्ठवंशी प्राणी आदी विविध गटांतील सजीवांच्या अभ्यासाचा समावेश होता. BNHS च्या अहवालात ही माहिती संकलित केली आहे. घुबडाची अत्यंत दुर्मीळ प्रजाती (फॉरेस्ट आऊलेट) या भागात आढळली आहे.


गारगाई धरणाचे बांधकाम केले तर सुमारे ४ लाख झाडे पाण्याखाली जातील. या प्रकल्पामुळे या अभयारण्यातील सजीवांसह संपूर्ण परिसंस्था बाधित होण्याची शक्यता आहे. याचे दूरगामी परिणाम भोगावे लागतील. या अभयारण्यात २१२ प्रकारचे पक्षी आढळून येतात. त्यांचे अधिवासही संकटात येऊ शकतात, असे रिठे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करण्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, तानसा आणि इतर अभयारण्यांमध्ये बांधण्यात आलेल्या धरणांमुळे हजारो एकर जैवविविधता असलेला जंगलाचा भाग पाण्याखाली गेला आहे. नवनवी धरणे बांधण्यापेक्षा पाण्याची गळती आणि दुरुपयोग रोखणे, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे, पिण्याव्यतिरिक्त इतर वापरासाठी पाण्याचा पुनर्वापर करणे, समुद्राच्या पाण्याचा विलवणीकरण प्रकल्प, पावसाच्या पाण्याची योग्य साठवणूक यावर मोठी गुंतवणूक करणे गरजेचे आहे. त्यातून पाणी बचत होऊन अभयारण्यातील जैवविविधताही टिकवता येईल, असे पत्रात सुचवले आहे.

बिबट्या, पिसुरी (माऊस डीअर), सांबर, लेपर्ड कॅट, रस्टी स्पॉटेड कॅट, साळिंदर (पॉर्क्युपाईन), रड्डी मुंगूस, कांडेचोर (स्मॉल इंडिअन सिवेट), तरस, खवलेमांजर (पँगोलीन) आदी सस्तन प्राणी या अभयारण्यात आहेत. चार शिंगांचे काळवीट या परिसरात आढळते. हे लक्षात घेऊन तानसा अभयारण्य अधिसूचित करण्यात आले. या भागात

१९८० पर्यंत वाघ दिसत होते, असे ‘झूऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया’ने १९९२ मध्ये केलेल्या अभ्यासाअंती नमूद केले आहे.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ५ अंक १)



**स्रोत** – ‘गारगाई धरणामुळे जैवविविधता धोक्यात, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचा आक्षेप’, *www.loksatta.com*, २१.०२.२०२४.

## नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र

### नवेगाव नागझिऱ्यात पर्यटनाच्या सुविधांमध्ये वाढ करण्याच्या विभागीय आयुक्तांच्या सूचना

नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात निसर्ग पर्यटनाचे नियमन आणि पर्यटनाच्या सोईसुविधांमध्ये वाढ करण्यासाठी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी स्थानिक सल्लागार समितीची बैठक घेतली. विदेशी पर्यटकांसाठी प्रवेश शुल्क आणि व्यावसायिक पर्यटन शुल्कामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्याची सूचना या बैठकीत त्यांनी केली. नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात जंगल सफारीसाठी विद्युतवाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यास तसेच क्षेत्रातील जलाशयात पर्यटकांसाठी हाऊसबोट, सौर बोट यांसह जलपर्यटनाकरता सुविधा निर्माण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.


नवेगाव नागझिरा क्षेत्रात सफारीसाठी एकूण १३५ वाहन संख्या मंजूर करण्यात आली आहे. सध्या तिथे ४५ जिप्सी गाड्या वापरात आहेत. तेव्हा १३५ ची संख्या पूर्ण करण्यासाठी वाहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या नव्या वाहनांमध्ये वीजेवर चालणाऱ्या वाहनांचा समावेश करण्याची सूचना विभागीय आयुक्तांनी केली. तसेच शालेय विद्यार्थ्यांना अल्पदरात जंगल सफारी करता यावी, यासाठी दोन बस सुरू करण्यास त्यांनी सांगितले.

पर्यटनवाढीला प्रोत्साहन देण्यासाठी व्याघ्र राखीव क्षेत्रातील वन्यजीव, पक्षी तसेच वृक्षांबद्दलची संपूर्ण माहिती पर्यटकांना देता यावी म्हणून इथल्या गाईडना विशेष प्रशिक्षण देण्याची गरज या बैठकीत मांडण्यात आली. तेव्हा गाईडना विदेशी पर्यटकांशी त्यांना संवाद साधता यावा यासाठी इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण देण्याची सूचना बिदरी यांनी केली.

व्याघ्र राखीव क्षेत्रालगत असलेल्या हॉटेल्स, रिसॉर्ट्समध्ये ५०% अपारंपरिक ऊर्जेचा वापर बंधनकारक करण्याबाबत; तसेच, ध्वनिप्रदूषण व विद्युत दिव्यांची प्रखर रोषणाई आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करून पिण्याचे पाणी काचेच्या किंवा स्टीलच्या बाटलीत पर्यटकांना उपलब्ध करून देण्यास त्यांनी सांगितले.

मागील वर्षात नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राला जवळपास ३५,००० पर्यटकांनी भेट दिली व त्यातून सुमारे ९६ लाख ४१ हजार रुपये शुल्क जमा झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी बैठकीत दिली.

**स्रोत** – ‘विदेशी पर्यटकांचे जंगल भ्रमण महागणार, काय आहेत कारणे?’, *www.loksatta.com*, ०९.०२.२०२४.



**संवर्धन केंद्रात जन्मलेली दहा गिधाडे पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात सोडली**



पेंच व्याघ्र राखीवमधील पूर्व पेंच वनपरिक्षेत्रात तयार करण्यात आलेल्या पिंजऱ्यात हरयाणातील पिंजोर इथे असलेल्या 'जटायू काँझर्व्हेशन अँड ब्रीडिंग सेंटर' म्हणजेच गिधाड संवर्धन केंद्रातून आणलेली दहा लांब चोचीची (लाँग-बिल्ड) गिधाडे पेंच प्रशासनाने केंद्राच्या मदतीने सोडली आहेत.

पेंच व्याघ्र राखीवमध्ये गिधाडांचा अधिवास आहे. १९९० ते २००६ या कालावधीत देशातील गिधाडांची संख्या पाळीव जनावरांसाठी असलेल्या औषधांच्या दुष्परिणामांमुळे अत्यंत वेगाने घटली. त्यामुळे गिधाडांचे संवर्धन करून त्यांची संख्या वाढवण्याकरिता हरयाणा, आसाम, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये गिधाड संवर्धन केंद्र सुरू करण्यात आली. या केंद्रामध्ये गिधाडांचे प्रजनन घडवून आणून वाढवलेल्या गिधाडांना नैसर्गिक अधिवासात सोडण्यास सुरुवात झाली. त्याचाच भाग म्हणून पेंच व ताडोबा अंधारी व्याघ्र राखीवमध्ये गिधाडांना सोडण्याचा निर्णय झाला. त्याला अनुसरून ही १० गिधाडे पेंच व्याघ्र राखीवमध्ये सोडली आहेत.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ४ अंक ३)

**स्रोत** – 'पेंच व्याघ्र प्रकल्पात सोडण्यात आली लांब चोचेची गिधाडं', *www.esakal.com*, २३.०१.२०२४.

**पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात ५२ मगरी**

पेंच व्याघ्र राखीवमध्ये वर्षभरात दुसऱ्यांदा मगर आणि कासव सर्वेक्षण करण्यात आले. त्यात ५२ मगरी; तर सॉफ्टशेल कासवांच्या अंड्यांची नोंद झाली. पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात जून २०२३ मध्ये पहिल्यांदा मगर आणि कासव सर्वेक्षण झाले. त्यानंतर २९ ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत दुसरे मगर आणि कासव सर्वेक्षण झाले.

सर्वेक्षणाचा उद्देश पेंचमधील मगरींची अंदाजे संख्या मोजणे व त्यांच्या वावराविषयी माहिती घेण्याचे होते. 'तिनसा इकॉलॉजिकल फाउण्डेशन'ने सर्वेक्षणाची पद्धत आणि समन्वयाची जबाबदारी पार पाडली.

सर्वेक्षणासाठी 'मॉडीफाईड बेल्ट ट्रान्सेक्ट ऑन बोट' पद्धत वापरली. पेंच क्षेत्राची तोतलाडोह, लोअर पेंच जलाशय आणि यांना जोडणारा तिसरा भाग अशी तीन भागांत विभागणी केली होती. पेंच नदीवरील १५ संरक्षण कुटी, वरच्या आणि खालच्या जलाशयासह नऊ संरक्षण कुटी सर्वेक्षणाकरता निवडल्या होत्या. प्रत्येक संरक्षण कुटीत दोन जणांचा एक संघ नेमण्यात आला होता. प्रत्येक संघाने कोलितमारा ते संबंधित संरक्षण कुटीपर्यंत प्रवासासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या वेळानुसार किमान तीन ते कमाल चार फेऱ्या केल्या.

**स्रोत** – 'पेंच व्याघ्र प्रकल्प ५२ मगरींचे माहेरघर, सॉफ्टशेल कासवांच्या अंड्यांचीही नोंद', *www.loksatta.com*, ०७.०२.२०२४.

**पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात २०२३ मध्ये वणव्याच्या फक्त तीन घटना**

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात वर्ष २०२३ मध्ये वणवा लागल्याच्या फक्त तीन घटनांची नोंद झाली असून त्यामध्ये ६ हेक्टर जंगल जळाल्याचे पेंच प्रशासनाने म्हटले आहे.

व्याघ्र राखीव क्षेत्रातील वणवे आणि आगीच्या घटना कमी करण्यासाठी २०२२ आणि २०२३ च्या उन्हाळ्यांत बफर क्षेत्रातील सुमारे ५० गावे आणि पेंच

क्षेत्राच्या सीमेवर असलेल्या इतर गावांमध्ये ‘अग्निमुक्त पेंच’ अभियान राबवण्यात आले.

अभियानात सहभागी होण्यासाठी इच्छुक गावांचे ठराव घेतले जातात. सर्व गावांमध्ये जनजागृतीसाठी, संवेदनशील वन क्षेत्रात गस्त घालण्यासाठी आणि आगीच्या घटना घडल्यास वन विभागाला मदत करण्यासाठी स्वयंसेवी गस्त पथके तयार केली जातात. आग प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी स्थानिक तरुणांची टीम तयार करणे, शेतकऱ्यांनी शेतजमिनीवर आग न लावणे, तेंदू पाने आणि मोहाच्या फुलांच्या संकलनासाठी आगी न लावणे, जाळीचा वापर करून मोहाच्या फुलांचे संकलन करणे, वनजमिनीत चराई टाळणे, गावात चारा बँक विकसित करणे, ग्राम पंचायती आणि इको-डेवलपमेंट समित्यांच्या बैठकी आदी विविध निकषांवर अभियानाच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन केले जाते.

गेल्या दोन वर्षांतील यशामुळे २०२४ च्या उन्हाळ्यातही अग्निमुक्त पेंच कार्यक्रम राबवण्यात येत आहे. १ मार्चपासून सुरू झालेले हे अभियान ३ जूनपर्यंत चालेल. परिणामकारकरित्या अभियान राबवणाऱ्या पहिल्या तीन गावांना प्रथम पुरस्कार ५१,००० रुपये, द्वितीय पुरस्कार ३१,००० रुपये आणि तृतीय पुरस्कार २१,००० रुपये व प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत.

वन विभागाची आकडेवारी

| **वर्ष** | **वणवा/आगीच्या घटना** | **जळालेले वन क्षेत्र (हेक्टर)** |
|---|---|---|
| २०२१ | ५४ | ६१९ |
| २०२२ | ३० | २१५ |
| २०२३ | ३ | ६ |

(वणव्याच्या राज्यस्तरीय परिस्थितीविषयीच्या सविस्तर वृत्तासाठी पान क्र. 12 पाहा.)

**स्रोत** – ‘पेंचमध्ये जळले ६ हेक्टर जंगल, २०२३ मध्ये वणव्यांवर नियंत्रण, अग्निमुक्त पेंच कार्यक्रमाला यश’, *https://marathi.indiatimes.com* १७.०३.२०२४.

**पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू; राष्ट्रीय महामार्ग ४४ वर ग्रामस्थांचा ‘रास्ता रोको’**



पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात ८ मार्च रोजी वाघाच्या हल्ल्यात एका मूकबधीर व्यक्तीचा मृत्यू झाला. त्यामुळे व्यक्तीचे कुटुंब आणि संतप्त ग्रामस्थांनी राष्ट्रीय महामार्ग ४४ वर देवळापार इथे ‘रास्ता रोको’ करत दोन तास वाहतूक रोखून धरली. मृताच्या कुटुंबियांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला आणि भरपाईदाखल नोकरी आणि वाघाला पकडण्याची मागणी वन विभागाकडे केली.

कडबीखेडा गावातील रहिवासी सुरजू झितू इनवटे (वय ५५) यांचा पेंचमधील पवनी युनिफाईड कंट्रोल वन्यजीव क्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. इनवटे गुरेढोरे व बकऱ्या चारण्यासाठी बफर क्षेत्रात गेले होते. तेव्हा वाघाने हल्ला केला.

ग्रामस्थांनी रास्ता रोकोमार्फत दर्शवलेल्या निषेधाची माहिती मिळताच पेंच व्याघ्र राखीव क्षेत्राचे उपसंचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ला यांनी आंदोलनस्थळी भेट दिली आणि ग्रामस्थांना आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. परिस्थिती आणखी चिघळू नये म्हणून वन विभागाने देवळापार पोलिसांची मदत घेतली. शुक्ला यांनी पाच लाख रुपयांचा धनादेश मृताच्या कुटुंबियांना दिला आणि भरपाईदाखल दिली जाणारी उर्वरित २० लाख रुपये रक्कम

पुढील ४८ तासांत देण्याची ग्वाही दिली. याविषयीचे पुढील वृत्त हाती आले नाही.

**स्रोत** – 'Tiger Attack: 'Rasta Roko' in Deolapar causes heavy traffic-jam for hours', *www.thehitavada.com*, १०.०३.२०२४.

**पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रातील गोल पहाडी परिसरात वनस्पतीच्या नव्या प्रजातीचा शोध**

भारतीय वन सर्वेक्षण (FSI) संस्थेच्या तांत्रिक सहकार्याधारे वन विभागाने केलेल्या सर्वेक्षणात *पॉलिगॉनम* जातीतील नवी प्रजाती *पॉलिगॉनम चतुर्भुजनम* ही पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रातील गोल पहाडी परिसरात दिसून आली आहे.

एका वर्षात केलेल्या सर्वेक्षणात वनस्पतींच्या ५५४ जाती व ११७ कुळांमधील ८६३ प्रजातींची नोंद पेंच क्षेत्रात झाली आहे. एकूण प्रजातींपैकी २९४ लहान, मऊ खोडाच्या वनस्पती (हर्ब), वृक्षांच्या या प्रदेशात निसर्गतः आढळणाऱ्या १५७ प्रजाती, १३१ वेली, १३१ गवताच्या प्रजाती, ५२ झुडुपे आणि उर्वरित रस्त्याच्या कडेने लावलेली झाडे आणि वृक्षांच्या आधाराने वाढणाऱ्या वनस्पती (एपिफाइट) आहेत. तसेच, ४६ प्रजाती भारतीय असून पैकी ३२ प्रजाती दुर्मीळ तर सहा प्रजाती भारतीय उपखंडात प्रदेशनिष्ठ आहेत. वन विभागाने प्रकाशित केलेल्या पत्रकात ही माहिती दिली आहे. सहा प्रदेशनिष्ठ प्रजातींची नावे *एजिनेटिआ इंडिका, बुऱ्हाविआ क्रिस्पा, हॅबेनॅरिआ गिब्सनी* वरायटी फीटिडा, *इफिजिनिआ पॅलिडा, पेटॅलिडियम बार्लेरिऑइडेस* आणि *बार्लेरिआ गिब्सनी* अशी आहेत.

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात गवताळ परिसंस्था नसून गवताच्या प्रजाती मोठ्या वृक्षांच्या सावलीच्या भागात वाढलेल्या दिसतात. ही परिस्थिती लक्षात घेता गवताच्या प्रजातींमध्ये मोठी विविधता आढळणे ही विशेष बाब असल्याचे वन विभागाने म्हटले आहे.

**स्रोत** – 'New plant species discovered in Maharashtra's Pench Tiger Reserve: Forest official', *www.timesofindia.indiatimes.com*, ०४.०१.२०२४.

## मुनिया संवर्धन राखीव क्षेत्र

**मुनिया संवर्धन राखीव क्षेत्रात कोळयांच्या ४६ प्रजातींची नोंद - वनाधिकाऱ्याचे संशोधन**

मुनिया संवर्धन राखीव क्षेत्रात कोळयांच्या ४६ प्रजाती आढळल्या आहेत. विभागीय वनाधिकारी नरेंद्र चांदेवार यांचा या विषयी शोधनिबंध 'जर्नल ऑफ एन्टॉमॉलाजी अँड झूऑलॉजी स्टडीज्'मध्ये प्रकाशित झाला आहे.

पेंच आणि ताडोबा अंधारी या दोन व्याघ्र राखीव क्षेत्रांना जोडणाऱ्या वन्यजीव भ्रमणपट्ट्यात हे मुनिया संवर्धन राखीव क्षेत्र आहे. त्यामध्ये बुटीबोरी आणि उत्तर उमरेड वनपरिक्षेत्राचा भाग येतो. चांदेवार यांनी या संवर्धन राखीव क्षेत्रातील दाट जंगल, झुडपी क्षेत्र, गवताळ प्रदेश अशा विविध अधिवासांत हे सर्वेक्षण केले.


मुनिया संवर्धन राखीव क्षेत्राची घोषणा झाल्यानंतर त्याचा व्यवस्थापन आराखडा तयार करायचा होता. वनस्पती, कीटक, गवत यांच्या प्रजातींची माहिती घेऊन मग हा आराखडा तयार करणे अपेक्षित आहे. ही आधाररेखा तयार करताना कोळयांच्या प्रजातींचा अभ्यास केल्याचे चांदेवार यांनी सांगितले.

**स्रोत** – 'मुनिया संवर्धन राखीव क्षेत्रात कोळयाच्या तब्बल ४६ प्रजाती', *www.loksatta.com*, ३०.०१.२०२४.



## मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्र

### मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्राजवळून रेल्वेमार्गासाठी वन जमिनीचा प्रस्ताव केंद्राकडून तूर्तास परत



केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या प्रादेशिक अधिकारप्राप्त समितीने दक्षिण मध्य रेल्वेचा ४९.६ हेक्टर वन जमीन वनेतर वापरासाठी हस्तांतरित करण्याची मागणी करणारा प्रस्ताव परत पाठवला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील वन जमीन अकोला – खांडवा रेल्वेमार्गाच्या रुंदीकरणासाठी मागणारा प्रस्ताव दक्षिण मध्य रेल्वेने दिला होता. मंत्रालयाच्या समितीने २६ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत हा प्रस्ताव त्यातील त्रुटींमुळे परत पाठवण्याचा निर्णय घेतला.

मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्रातून जाणाऱ्या मीटर गेज रेल्वेमार्गाच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव राज्य सरकार आणि राष्ट्रीय वन्यजीव मंडळा- (नॅशनल बोर्ड फॉर वाइल्डलाईफ) च्या स्थायी समितीने फेटाळला होता. हा रेल्वेमार्ग १९५९-६० मध्ये बांधला होता. अकोला ते रतलाम या ४७३ किलोमीटर लांबीच्या रुंदीकरणाच्या प्रकल्पाचा भाग म्हणून मेळघाटातील या मार्गाचे रुंदीकरण प्रस्तावित होते. त्यासाठी अकोला ते खांडवा या टप्प्यातील रेल्वे वाहतूक १ जानेवारी २०१७ पासून थांबवण्यात आली. इतर टप्प्यांमध्ये रुंदीकरणाचे काम चालू असताना अकोट ते अमलाखुर्द या ७८ किलोमीटर अंतराचे काम वन्यजीव मंजुरीअभावी थांबले आहे.

वन्यजीव मंजुरीचा प्रश्न भविष्यातही निर्माण होत राहील, हे लक्षात घेऊन रेल्वेने जून २०२२ मध्ये या टप्प्याचे काम करण्याचा बेत रद्द केला. त्याऐवजी मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्राच्या बाहेरून रेल्वेमार्गाची आखणी केली आणि त्यासाठी ४९.६ हेक्टर वन जमिनीच्या वनेतर वापरासाठी हस्तांतरणाचा प्रस्ताव मांडला.

नव्या प्रस्तावानुसार रेल्वेमार्ग अकोट, हिवरखेडा, सोनाळा, जळगाव जामोद आणि उसामी या ठिकाणांमधून जातो. त्याकरता ३० किलोमीटर अंतर वाढले असून ७ किलोमीटर बोगदाही खोदावा लागणार आहे. बुलढाण्यातील क्षेत्रीय वनातील कक्ष ६२५, ६२७ व ४५३ मधून हा मार्ग प्रस्तावित आहे.

बुलढाण्याच्या उप वनसंरक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार कक्ष ६२५ व ६२७ मध्ये घनदाट व वैविध्यपूर्ण वृक्षराजी आहे. त्या तुलनेत ४५३ क्रमांकाच्या कक्षात वृक्ष घनता कमी आहे. परंतु, एकूणच प्रस्तावित भागात वाघासह बिबट्या, नीलगाय, रानडुक्कर व अन्य वन्य प्राण्यांच्या अस्तित्वाची नोंद झाली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. नव्या प्रस्तावानुसार कक्ष ४५३ व ६२७ मध्ये ८,००० पेक्षा जास्त वृक्ष तोडावे लागणार आहेत.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड २ अंक ४, खंड ३ अंक ३, खंड ४ अंक १, ३)

**स्रोत** – विजय पिंजरकर. 'Panel returns proposal for forest land diversion to upgrade rly. line', *www.timesofindia.indiatimes.com*, १९.०३.२०२४.

## सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्र

### चांदोली अभयारण्यालगतच्या परिसरात माणूस वन्यजीव संघर्षाच्या आठ गंभीर घटना

सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राचा भाग असलेल्या चांदोली वन्यजीव अभयारण्यालगतच्या परिसरातील शेतशिवारात बिबट्या, रानडुक्कर व गव्यांचा वावर वाढल्यामुळे शेतकरी, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे; तर गावांमध्ये

वानरांचा वावर वाढल्यामुळे घरांचे नुकसान होत आहे. इतर वन्य प्राण्यांबरोबरच गावात येणाऱ्या वानरांचाही बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिकांमध्ये जोर धरू लागली आहे.

सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रापासून ३० ते ४० किलोमीटर परिसरात झालेल्या, वृत्तात नमूद केलेल्या गेल्या काही आठवड्यांतील घटना पुढीलप्रमाणे –

- बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शाहूवाडी तालुक्यातील उखळू इथे आठ वर्षांचा मुलगा जखमी झाला.
- उदगिरी इथे १० वर्षांच्या मुलीचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला.
- शित्तुर इथे शेतकऱ्याचा गव्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आणि अशा दुसऱ्या घटनेत एक शेतकरी जखमी झाला.
- मणदूर इथे सहा नागरिक गव्याच्या हल्ल्यात जखमी झाले.
- चव्हाणवाडी व वाकुर्डे (दोन्ही जि. सांगली, ता. शिराळा) इथे बिबट्यांचे मृत्यू झाले.
- रिळे इथे सहा गव्यांचा मृत्यू झाला.
- रेठरे (जि. सांगली, ता. वाळवा) इथे बामणधरा परिसरात काही दिवसांपूर्वी मृत बिबट्या आढळला.

तसेच, वन्य प्राण्यांनी पशुधनावर हल्ले केल्याच्या घटनांचीही नोंद झाली आहे.

या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी वन विभाग, प्राणिप्रेमी, स्वयंसेवी संस्था, वन अभ्यासक, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी संयुक्तपणे उपाययोजना सुचवण्याची गरज वृत्तात मांडली आहे. लोकप्रतिनिधींनी अभयारण्याला तारेचे कुंपण, चर खोदणे, जंगलात पाणवठे वाढवणे यासाठी वन विभागाने प्रयत्न करावेत, गव्याचे हल्ले रोखण्यासाठी वन विभागाने नागरिकांना स्वसंरक्षणार्थ उपाययोजना करण्यासाठी मार्गदर्शन करावे, या सूचनाही केल्या आहेत.

**स्रोत** – विजय पाटील. 'मानव-वन्य प्राण्यांत संघर्ष वाढला; जंगल सोडून प्राणी का पडताहेत बाहेर?' *www.esakal.com*, ०७.०३.२०२४.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ठाणे-बोरिवली बोगदा खोदण्याला राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मंजुरी

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून प्रस्तावित ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाला राष्ट्रीय वन्यजीव मंडळा- (नॅशनल बोर्ड फॉर वाइल्डलाइफ) -ने मंजुरी दिली आहे. मात्र, या बोगद्यासाठी राष्ट्रीय उद्यानातील १२२ ऐवजी २३५ वृक्ष तोडावे लागणार आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) ठाणे आणि बोरिवलीदरम्यान ११.८ किमी लांबीचा दुहेरी भुयारी मार्ग बांधत आहे. हैदराबाद इथल्या 'मेघा इंजिनीयरिंग इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीला या कामाचे कंत्राट MMRDA ने दिले आहे. या कामासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात भुयारीकरणासाठी अवाढव्य यंत्र भूगर्भात सोडावी लागणार आहेत. त्याकरता २७ ठिकाणी बोअर खोदावे लागणार आहेत. पैकी १५ बोअर सहा इंच परिघाचे असून ही १५ बोअर संरक्षित क्षेत्र तसेच पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात असून यासाठी उद्यान क्षेत्रातील १२२ वृक्ष तोडावे लागणार असल्याची माहिती MMRDA ने राज्य वन्यजीव मंडळा- (स्टेट बोर्ड फॉर वाइल्डलाईफ) -कडे सादर केलेल्या प्रस्तावात दिली होती.

आता मात्र तोडाव्या लागणाऱ्या झाडांच्या संख्येत वाढ झाल्याची माहिती समोर आली आहे; १२२ ऐवजी २३५ वृक्ष तोडावे लागणार आहेत. त्या बदल्यात MMRDA ला इतरत्र वनीकरण करावे लागणार आहे. त्यासाठी छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील फुलंब्रीतील उमरावती इथे ३५.५३ हेक्टर जागा वापरण्याचे ठरले आहे.

(संबंधित वृत्त पाहा महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ४ अंक ३,२, खंड ५ अंक १)

**स्रोत** – 'ठाणे-बोरिवली दुहेरी बोगद्यासाठी २३५ झाडांवर कुऱ्हाड', www.loksatta.com, ०६.०२.२०२४.

## प्रादेशिक बातम्या

राज्यव्यापी

**पाच वर्षांत राज्यात २०२३ मध्ये सर्वात कमी वणवे - माहितीच्या अधिकाराद्वारे मिळाली आकडेवारी**



महाराष्ट्रात वणव्याच्या घटनांमध्ये वर्ष २०२३ मध्ये गेल्या चार वर्षांच्या तुलनेत घट झाली आहे. वन विभागाने माहितीच्या अधिकारात दिलेल्या माहितीत ही बाब समोर आली आहे. कार्यकर्ता अभय कोलारकर यांनी ही माहिती मागितली होती.

वर्ष २०१९ ते २०२३ या काळात वणव्याच्या एकूण ३७,४०३ घटनांमध्ये १,२८,३१५ हेक्टर वन नष्ट झाले व ३ कोटी १६ लाख रुपयांचे नुकसान झाले.

राज्यातील १५ वन वृत्तांपैकी, गडचिरोली वन वृत्तात सर्वाधिक ३१,२०७ हेक्टर वन वणव्यात नष्ट झाले. गडचिरोली वृत्तातच सर्वाधिक १०,१९८ वणव्याच्या घटनांची नोंद या पाच वर्षांत झाली. कोल्हापूर वन वृत्तात सर्वाधिक ५१ लाख ७३ हजार रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले. त्या पाठोपाठ धुळे (रु. ४३ लाख ३६ हजार), नाशिक (रु. ४२ लाख ११ हजार) आणि ठाणे (रु. ४० लाख ३८ हजार) या वृत्तांमध्ये पाच वर्षांत मालमत्तेचे नुकसान झाले.

विदर्भातील सात – चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, नागपूर (वन्यजीव), अमरावती, यवतमाळ आणि मेळघाट - वन वृत्तांमध्ये २०१९ ते २०२३ या काळात ७७,८०० हेक्टर जमिनीवरील वन वणव्यात नष्ट झाले. राज्यात वणव्यात नष्ट झालेल्या एकूण वन क्षेत्रापैकी हे ६०.६३% क्षेत्र आहे.

गेल्या पाच वर्षांतील वणव्याच्या सर्वात कमी – ५,२७४ घटनांची नोंद राज्यात वर्ष २०२३ मध्ये झाली. त्यात १२,९२१.६० हेक्टर क्षेत्रावरील वन नष्ट झाले. मात्र, हे देखील गेल्या पाच वर्षांत नष्ट झालेले सर्वात कमी वन आहे.

२०२३ मध्ये राज्य सरकारला आगीपासून वनाचे रक्षण करण्यासाठी असलेल्या एका योजनेत केंद्र सरकारकडून सर्वाधिक १६ कोटी २५ लाख रुपये निधी मिळाला. २०१९ ते २०२३ या काळात महाराष्ट्राला एकूण ७० कोटी २७ लाख रुपये निधी मिळाला. याच काळात राज्याला केंद्र सरकारच्या वणवा प्रतिबंध व व्यवस्थापन योजनेतून ३५ कोटी ६० लाख रुपये निधी मिळाला. पैकी सर्वाधिक १३ कोटी २१ लाख रुपये वर्ष २०१८-१९ या वर्षात मिळाले व त्या खालोखाल ७ कोटी ५० लाख रुपये २०२३ साली मिळाले.

महाराष्ट्रातील वनांमध्ये वणव्याच्या घटना प्रामुख्याने फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान घडून येतात. हा काळ तेंदू पाने गोळा करण्याचा आणि मोहाच्या फुलांच्या वेचणीचा हंगाम आहे. पश्चिम महाराष्ट्रात आपट्याची पाने गोळा करण्याच्या काळात वणवे लागतात, असे नागपूरचे मानद वन्यजीव रक्षक अजिंक्य भाटकर यांनी सांगितले.

दरम्यान, २०२३ मध्ये पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रातही वणव्याच्या कमी म्हणजे अवघ्या तीन घटनांची नोंद झाल्याचे वृत्त अंकात यापूर्वी (पान क्र. 7) आले आहे.


**स्रोत** – कौशिक भट्टाचार्य. '2023 sees drastic decline in fire incidents in State forests', *www.thehitavada.com*, १६.०२.२०२४.

## राज्यात वन्यजीव ‘वन हेल्थ’ केंद्र उभारण्यासाठी ‘MAFSU’कडून ३० कोटी रुपयांचा प्रस्ताव

नागपुरातील ‘महाराष्ट्र प्राणी आणि मत्स्यसाठे विज्ञान विद्यापीठ’ (MAFSU) ने वन्यजीव ‘वन हेल्थ’ केंद्राच्या उभारणीसाठी राज्य सरकारला ३० कोटी रुपयांचा प्रस्ताव दिला आहे. प्रस्तावित केंद्र गोरेवाडा इथल्या वन्यजीव संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रा- (WRTC) -चा विस्तारित भाग असेल.

‘MAFSU’ने सरकारला दिलेल्या प्रस्तावात आवश्यक उपकरणांची सविस्तर माहिती, पाच वर्षांपुरते कर्मचारी आणि इतर गरजेच्या बाबींचा समावेश आहे. या प्रकल्पात वन्य प्राणी आणि त्यांच्या संपर्कात माणसांच्या येण्यामुळे उद्भवणाऱ्या रोगांशी सामना करण्याबाबत काम केले जाईल, असे ‘MAFSU’चे माहिती संचालक व प्राणी आरोग्य विभाग प्रमुख डॉ. शिरीष उपाध्ये यांनी सांगितले. माणूस वन्यजीव संघर्षाच्या वाढत्या घटनांमुळे वन्य प्राण्यांच्या आरोग्यातही गुंतागुंतीचे बदल होत असल्याची शक्यता आहे. प्रस्तावित केंद्रात त्याचाही अभ्यास केला जाणार आहे, असे ते म्हणाले.

**स्रोत** – चैतन्य देशपांडे. ‘MAFSU’s proposed Wildlife One Health Centre to be first in India’, *www.timesofindia.indiatimes.com*, १३.०२.२०२४.



## सर्व व्याघ्र राखीव क्षेत्रांतील व्याघ्र संवर्धन संस्थांसाठी ३६ कोटी ७९ लाख रुपयांची वार्षिक तरतूद

राज्याच्या वन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील व्याघ्र संवर्धन संस्था (TCF) कार्यकारी समितीने सहा व्याघ्र राखीव क्षेत्रांतील TCF साठी मिळून ३६ कोटी ७९ लाख रुपयांचा वार्षिक अर्थसंकल्प मंजूर केला. वन्यजीव संरक्षण सुधारणा कायदा २००६ अनुसार व्याघ्र राखीव क्षेत्रांच्या व्यवस्थापनाला बळकटी देण्यासाठी अतिरिक्त संस्थात्मक पाठींबा म्हणून प्रत्येक व्याघ्र राखीवला TCF ची स्थापना बंधनकारक आहे.

सर्वाधिक १६ कोटी रुपयांची तरतूद ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रातील TCF साठी, त्यानंतर पेंच व बोर (रु. ७ कोटी ७० लाख), मेळघाट (रु. ७ कोटी ३ लाख), सह्याद्री (रु. ४ कोटी ५० लाख) आणि नवेगाव नागझिरा (रु. १ कोटी ५६ लाख) अशी तरतूद यंदा केली आहे.

वर्ष २०२२-२३ मध्ये मंजूर अर्थसंकल्प २६ कोटी १४ लाख रुपयांचा होता. मात्र, ताडोबा अंधारी वगळता अन्य व्याघ्र राखीव क्षेत्रांतील TCF नी मंजूर रकमेपेक्षा कमी खर्च केला. एकूण खर्च २३ कोटी ८७ लाख रुपये इतका झाला. ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्राचा खर्च १२ कोटी ६७ लाख रुपये झाला; मात्र त्यासाठी तरतूद १० कोटी १५ लाख रुपयांची होती.

वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सर्व व्याघ्र राखीव क्षेत्रांना पर्यटनाच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, सेल्फी पॉइंट्स, प्रतिक्षागृहे, स्मृतिपर चिन्हांची दुकाने आणि स्थानिक उत्पादनांच्या विक्रीसाठी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सूचना त्यांनी केल्या. तसेच स्थानिक युवावर्गासाठी कौशल्यविकासाच्या सुविधा देण्यास अधिकाऱ्यांना सांगितले. राज्यातील सर्व व्याघ्र राखीव क्षेत्रांनी समान पंचवार्षिक पर्यटन कार्यक्रम आखण्याची सूचना वन मंत्र्यांनी केली. या कार्यक्रमाद्वारे पर्यटनाच्या सुविधांमध्ये समानता आणण्याचा उद्देश आहे.

सहा व्याघ्र राखीव क्षेत्रांमधील TCF च्या अधिकाऱ्यांची २४ जानेवारी २०२४ रोजी बैठक घेऊन वन मंत्र्यांनी 'वंदे मातरम् वन सेवा केंद्रां'ची स्थापना करण्याचे निर्देश दिले. वन नियम व नियंत्रण, सरकारी योजनांची माहिती या केंद्रांमार्फत व्याघ्र राखीव क्षेत्रातील जनतेपर्यंत पोहोचवण्यात येईल. पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात अशा प्रकारची दोन केंद्रे सुरू झाली आहेत.

TCF चा बहुतांश निधी पर्यटन आणि बफर क्षेत्रातील अधिवास विकासासाठी वापरण्याचा प्रस्ताव असल्याचे वनाधिकाऱ्यांनी सांगितले. दखलपात्र रक्कम संशोधन आणि कर्मचाऱ्यांच्या क्षमता बांधणीसाठी प्रस्तावित असल्याचेही ते म्हणाले.

मुख्य वन सचिव बी वेणुगोपाल रेड्डी, प्रमुख मुख्य वन संरक्षक (PCCF) आणि वन बल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, PCCF (वन्यजीव) महीप गुप्ता आणि सर्व सहा – ताडोबा अंधारी, नवेगाव नागझिरा, सह्याद्री, बोर, पेंच व मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्रांचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

**स्रोत** – 'Unified tourism plan for tiger reserves now', *www.timesofindia.indiatimes.com*, २५.०१.२०२४.
विजय पिंजरकर. '₹36.79 crore budget for better mgmt of Maha tiger reserves', *www.timesofindia.indiatimes.com*, २९.०१.२०२४.

## वनरक्षक पदभरतीच्या नागपुरातील शारीरिक चाचणीच्या वेळी अव्यवस्थेचा उमेदवारांचा आरोप

वन विभागातील वनरक्षक पदाच्या भरती प्रक्रियेचा भाग असलेल्या शारीरिक चाचणीच्या ठिकाणी अव्यवस्था होती, असा आरोप उमेदवारांनी केला आहे.

वन विभागात खालच्या फळीतील कर्मचारी भरती बऱ्याच वर्षांनंतर होत आहे. भरतीसाठी ऑगस्ट-सप्टेंबर २०२३ या कालावधीत लेखी परीक्षा घेण्यात आली. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी झाली. पडताळणीनंतर निवड झालेल्या उमेदवारांची शारीरिक चाचणी फेब्रुवारी महिन्यात झाली. त्यासाठी राज्यातून सुमारे ६०,००० उमेदवार पात्र ठरले होते. पैकी सुमारे ३०,००० उमेदवारांची शारीरिक चाचणी नागपुरातील मिहान परिसरात झाली.

वन विभागाच्या शारीरिक चाचणीला सकाळी सहा वाजल्यापासून सुरुवात होते. मात्र, यंदा फेब्रुवारी महिन्यातच ऊन तापू लागल्यामुळे सकाळी आणि सायंकाळी अशा दोन सत्रांत ही चाचणी घेण्यात आली. चाचणीच्या पहिल्या दिवशी नोंदणी व इतर प्रक्रियेत वेळ गेल्यामुळे चाचणीसाठी वेळ दिलेल्या काही उमेदवारांची चाचणी होऊ शकली नाही. त्यांना दुसऱ्या दिवशी बोलावण्यात आले. उमेदवारांची संख्या जास्त असल्याने त्यांची कागदपत्रे तपासून त्यांना चाचणीसाठी तयार केल्यावर ऊन जास्त असल्यामुळे त्यांना बसवून ठेवले आणि ऊन कमी झाल्यानंतर त्यांची चाचणी घेतली. त्यावर अनेक उमेदवारांनी या प्रक्रियेत अव्यवस्था असल्याचा आरोप केला.

अनेक उमेदवारांसोबत त्यांचे पालक आले होते. त्यांना दूर बसवून ठेवण्यात आल्याने भरती प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत शंका उत्पन्न झाल्या. पालकांनी चाचणीच्या दुसऱ्या दिवशी आक्रमक पवित्रा घेतला होता. मात्र, ही प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शकरित्या होत असून यात कोणताही मानवी हस्तक्षेप नसल्याचे वनाधिकाऱ्यांनी समजावून सांगितल्यानंतर पालक शांत झाले. नागपूर वन विभागातील वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.

**स्रोत** – 'वन खात्यातील वनरक्षक भरतीप्रक्रिया; शारीरिक चाचणीत अव्यवस्थेचा आरोप', *www.loksatta.com*, २३.०२.२०२४.

**राज्यात माणूस वन्यजीव संघर्षापोटी २०२३-२४ मध्ये १३ कोटी ६८ लाख रुपयांची भरपाई**

माणूस वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये झालेल्या नुकसानाच्या भरपाईदाखल महाराष्ट्र वन विभागाने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये १३ कोटी ६८ लाख रुपये दिले आहेत. मागील पाच ते सहा वर्षांत वन्यजीवांमुळे झालेले नुकसान आणि त्यापोटी वन विभागाने दिलेली भरपाई यांचा आलेख चढताच राहिला आहे.

गेल्या सहा आर्थिक वर्षांची वन विभागाची आकडेवारी

| वर्ष | मानवी मृत्यू | पिकांच्या नुकसानाच्या घटना | पाळीव प्राणी जखमी किंवा मृत | भरपाईची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | ३६ | ३७,९७१ | ८,३११ | २ कोटी ७४ लाख ३० हजार |
| २०१९-२० | ४७ | ३८,३४७ | ९,२५८ | ७ कोटी ३ लाख ५० हजार |
| २०२०-२१ | ८२ | ३०,९५३ | ९,१३९ | ८ कोटी २ लाख २० हजार |
| २०२१-२२ | ८६ | ५६,४०२ | १०,३१७ | ८ कोटी ४० हजार |
| २०२२-२३ | १११ | ५४,०३६ | १२,५१७ | १२ कोटी ७० लाख ७० हजार |
| २०२३-२४ | ५९ | १,०४,४३६ | ४,६४८ | १३ कोटी ६८ लाख |

**स्रोत** - सूरज कोळेकर. 'विभागाच्या खर्चाचा सहा वर्षांत चढता आलेख', *https://marathi.indiatimes.com*, २९.०३.२०२४.

**दहा वर्षांत महाराष्ट्र वन विभागाकडून माणूस वन्यजीव संघर्षाप्रसंगी सुमारे ४५० कोटींची भरपाई**

महाराष्ट्र वन विभागाने १ जानेवारी २०१२ ते २६ जानेवारी २०२३ या १० वर्षांच्या काळात माणूस वन्यजीव संघर्षाच्या प्रसंगांमध्ये झालेल्या नुकसानाच्या भरपाईदाखल ४५७.८३ कोटी रुपये दिले आहेत. माणसांचे मृत्यू, जखमी होणे, गुराढोरांची हानी आणि पिकांचे नुकसान या कारणांसाठी ही भरपाई वन विभागाने दिली आहे.

प्रस्तुत वृत्ताच्या स्रोतात दिलेल्या वृत्तपत्राने माहितीच्या अधिकारांतर्गत महाराष्ट्र वन विभागाकडून ही माहिती मिळवली आहे. माहिती अधिकारात विचारलेल्या प्रश्नांमध्ये वृत्तपत्राने वाघ, बिबट्या, हत्ती, अस्वल आणि रानडुकराशी संबंधित घटनांची विचारणा केली होती. पिकांचे नुकसान आणि गुराढोरांचे मृत्यू याविषयी प्रश्न विचारले होते. संघर्षाच्या बहुतांशी घटना या वाघ आणि बिबट्याभोवती घडलेल्या आहेत, असे प्रश्नाच्या उत्तरादाखल मिळालेल्या माहितीत स्पष्ट झाले आहे.


जानेवारी २०१२ ते जानेवारी २०२३ या काळात राज्यात माणूस वन्यजीव संघर्षात ६२४ व्यक्तींचा मृत्यू झाला असून ५,००० पेक्षा जास्त लोक जखमी झाले. गेल्या १० वर्षांत दरवर्षी सरासरी ३५ व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आणि सरासरी ३५० व्यक्ती जखमी झाल्या. सर्वाधिक ९८ मृत्यू वर्ष २०२२ पासून ते जानेवारी २०२३ या काळात झाले. त्यापूर्वी २०२१-२२ या वर्षात ८६ आणि २०२०-२१ या वर्षात ८२ मृत्यू झाले. सर्वाधिक ७०० लोक २०१५-१६ मध्ये झाले. त्या पाठोपाठ ६८६ व ६४८ लोक अनुक्रमे २०१६-१७ व २०२२-२३ या वर्षांत जखमी झाले.

(वरील वृत्तातील आकडेवारी व या वृत्तातील आकडेवारीत असलेल्या फरकांविषयी स्पष्टीकरण देणे आम्हाला शक्य झाले नाही.)

**स्रोत** – रणजीत जाधव. 'Man-animal conflict costs Maharashtra Rs. 450 cr. over past 10 years', *www.mid-day.com*, ११.०४.२०२४.

## विदर्भ

### विदर्भातील जंगलांमुळे सिंचन प्रकल्प रखडतात - राज्याच्या मुख्य सचिवांचे न्यायालयात शपथपत्र



"विदर्भाचा ३५% भूभाग वनाच्छादित आहे. त्यामुळे विदर्भात सिंचन प्रकल्प राबवताना पर्यावरण आणि वन विभागाची मंजुरी गरजेची ठरते. ही प्रक्रिया वेळखाऊ असल्याने विदर्भातील सिंचन प्रकल्प रखडलेले आहेत", अशा आशयाचे शपथपत्र राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर ३१ जानेवारी रोजी सादर केले. विदर्भात मंजूर करण्यात आलेले १३१ सिंचन प्रकल्प जंगलांमुळे रखडले असल्याचे मुख्य सचिवांनी न्यायालयाला सांगितले.

'लोकनायक बापूजी अणे स्मारक समिती'चे सदस्य अमृत दिवान यांनी विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्पांबाबत जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेवरील मागील सुनावणीदरम्यान न्यायालयाने सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात होणाऱ्या दिरंगाईवर नाराजी व्यक्त करत मुख्य सचिवांना सविस्तर शपथपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत मुख्य सचिवांनी ३१ जानेवारी रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयात शपथपत्र दाखल केले.

विदर्भात मंजूर करण्यात आलेले १३१ सिंचन प्रकल्प जंगल भागात येतात. यापैकी ४६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत; तर ५९ प्रकल्पांचे काम सुरू आहे. १६ प्रकल्प राज्य शासनाने रद्द केले आहेत. १० प्रकल्पांचे काम अद्याप सुरू झालेले नाही, असे शपथपत्रात म्हटले आहे.

प्रकल्प राबवण्यात उशीर होण्यामागे वन आणि पर्यावरण विभागाची मंजुरी मिळण्यात होणारा उशीर, भूसंपादन प्रक्रिया, पुनर्वसन आणि अन्य तांत्रिक बाबींचा समावेश आहे, असे मुख्य सचिवांनी न्यायालयात सांगितले.

विदर्भातील मंजूर प्रकल्पांपैकी १५ प्रकल्पांना मंजुरीसाठी वन विभागाच्या आणि १२ प्रकल्पांना पर्यावरण विभागाच्या मंजुरीसाठी पाठवले होते. या प्रकल्पांना दोन्ही विभागांकडून मंजुरी मिळाली आहे, असेही मुख्य सचिवांनी न्यायालयात सांगितले.

**स्रोत** – 'जंगलांमुळे रखडले विदर्भातील सिंचन प्रकल्प; मुख्य सचिवांचे उच्च न्यायालयात शपथपत्र', *www.loksatta.com*, ३१.०१.२०२४.

### कमलापुरातील हत्ती पेंचमध्ये नेण्याचा बेत तूर्तास रद्द

गडचिरोली जिल्ह्यात अहेरी तालुक्यातील कमलापूर इथे असलेल्या शासकीय हत्ती छावणीतील 'मंगला' नामक हत्तिणीला पेंच अभयारण्यात हलवण्याला स्थानिक ग्रामस्थांनी विरोध केला. त्यानंतर, राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हस्तक्षेप केला आणि मंगलाला नेण्यासाठी ७ फेब्रुवारी रोजी आलेले पथक रिकाम्या वाहनासह परतले.

वन विभागातील अवजड कामे करण्यासाठी ७०-८० वर्षांपूर्वी गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली व सिरोंचा वन विभागात केरळहून काही हत्ती आणले होते. तेव्हापासून कमलापूर इथे छावणीत हत्तींचे वास्तव्य आहे. गेल्या दोन वर्षांपासून इथल्या हत्तींना इतरत्र पाठवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यापूर्वी या हत्तींना गुजरातमधील जामनगर इथे रिलायन्स कंपनीच्या प्राणिसंग्रहालयात पाठवण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र, स्थानिकांचा आणि प्राणिप्रेमींचा मोठा विरोध झाल्याने आलापल्ली जवळील 'पातानील' इथले तीन हत्ती प्राणिसंग्रहालयासाठी पाठवले.


(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ३ अंक १,२,३,४)

सध्या कमलापूर छावणीत आठ हत्ती असून त्यातील मंगलाला पेंच संरक्षित क्षेत्रात नेण्यासाठी मागील काही दिवसांपासून प्रयत्न सुरू होते.

मंगलाला घेऊन जाण्यासाठी मोठे वाहन परिसरात दाखल होताच गावकऱ्यांनी विरोध सुरू केला. ही बातमी जिल्ह्यात पसरताच पर्यटकांनीही विरोधाचा सूर आळवला. ही बाब वन मंत्री मुनगंटीवार यांच्या कानावर येताच त्यांनी हत्ती हलवण्याच्या हालचाली थांबवण्याची सूचना केली.

एकेकाळी नक्षली चळवळीच्या हिंसक कारवायांसाठी ओळखला जाणारा अहेरीचा परिसर गेल्या १० वर्षांत हत्ती छावणीमुळे पर्यटनस्थळ म्हणून नावारूपास आला आहे. दरवर्षी हजारो पर्यटक येथे भेट देतात.

**स्रोत** – 'गडचिरोली : 'मंगला'ला नेण्यासाठी आलेल्यांना परत पाठवले, हत्ती स्थलांतराला गावकऱ्यांचा विरोध', *www.loksatta.com*, ०७.०२.२०२४.



## चंद्रपुरात आंतरराष्ट्रीय सफारीचे नियोजन; ताडोबा महोत्सवात राज्याच्या वन मंत्र्यांची घोषणा

सिंगापूरच्या धर्तीवर चंद्रपुरात सफारी सुरू करून त्यासाठी परदेशातून विविध प्राणी चंद्रपुरात आणण्यासाठी नियोजन केले आहे, अशी माहिती राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. महाराष्ट्र शासन आणि वन विभागाच्या वतीने चंद्रपुरात मार्च महिन्याच्या सुरुवातीला आयोजित 'ताडोबा महोत्सवा'चे उद्घाटन करताना ते बोलत होते.

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रातर्फे वन्यजीव संरक्षण, शाश्वत पर्यटन आणि स्थानिक वारसा यांना चालना देण्यासाठी तीन दिवसीय 'ताडोबा महोत्सव २०२४' भरवण्यात आला होता. महोत्सवात नागरिकांसाठी विविध विषयांवर चर्चासत्रे, परिसंवाद आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**स्रोत** – '"सिंगापूरच्या धर्तीवर चंद्रपुरात सफारी सुरू करणार", वनमंत्री सुधीर मुनंगटीवार यांची घोषणा; म्हणाले…' , *www.loksatta.com*, ०२.०३.२०२४.

## पश्चिम महाराष्ट्र

### राज्यातील पहिली वन्यजीव न्यायवैद्यक प्रयोगशाळा पुण्यात प्रस्तावित; जागासुद्धा निश्चित

महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, कर्नाटक या राज्यांमधील सह्याद्रीच्या प्रदेशातील वन्य प्राण्यांच्या नमुन्यांचे विश्लेषण करण्यासाठी राज्यातील पहिली वन्यजीव न्यायवैद्यक प्रयोगशाळा पुण्यात उभारण्याचा प्रस्ताव आहे.

'झूऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया' (ZSI) च्या पश्चिम प्रादेशिक केंद्राने या प्रयोगशाळेच्या निर्मितीसाठी केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला आहे. प्रयोगशाळा उभारण्यासाठी ZSI च्या पुण्यातील केंद्राने आकुर्डी इथे आवारात जागा निश्चित केली आहे. केंद्र सरकारकडून मान्यता मिळताच प्रयोगशाळेच्या निर्मितीला सुरुवात होईल.

ZSI च्या पुण्यातील पश्चिम प्रादेशिक केंद्राला ६५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल फेब्रुवारी महिन्यात आयोजित पत्रकार परिषदेत केंद्राचे प्रभारी अधिकारी आणि शास्त्रज्ञ डॉ. बासूदेव त्रिपाठी यांनी ही माहिती दिली.

तस्करी प्रकरणातील कायदेशीर चौकशी किंवा संशोधनासाठी वन्य प्राण्यांची त्वचा, नखे आणि अन्य नमुने रासायनिक विश्लेषणासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवले जातात.  संपूर्ण सह्याद्रीतील वन्य प्राण्यांबाबत अशा प्रकारच्या विश्लेषणाची जबाबदारी ZSI च्या पश्चिम प्रादेशिक केंद्राकडे आहे. हे केंद्र विश्लेषणासाठी आलेले नमुने कोलकाता इथल्या ZSI च्या मुख्य कार्यालयातील

न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवते. त्यामुळे महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, कर्नाटक या राज्यातील नमुन्यांच्या विश्लेषणासाठी पुण्यात न्यायवैद्यक प्रयोगशाळा स्थापन करण्याबाबत प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे.

सह्याद्रीच्या जंगलांमध्ये अत्यंत दुर्मीळ असणारे, नामशेष होण्याच्या मार्गावर असणारे आणि नामशेष झालेल्या वन्य प्राण्यांसह अन्य जीवांचे नमुने संग्रही ठेवण्यासाठी प्राणिभांडार उभारण्याला केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने मान्यता दिली आहे. त्याकरता केंद्र सरकारकडून निधी मिळणार आहे, असेही त्रिपाठी यांनी सांगितले.

**स्रोत** – 'पुण्यात वन्यजीव न्यायवैद्यक प्रयोगशाळा ;
राज्यातील पहिलाच प्रकल्प',
*www.esakal.com*, २४.०२.२०२४.

### जागतिक वन्यजीव दिवसाचे औचित्य साधून सांगली वन विभागाची डिजिटल उपकरणांमध्ये गुंतवणूक

वर्ष २०२४ च्या जागतिक वन्यजीव दिवस - ३ मार्चची संकल्पना 'लोक आणि पृथ्वी यांना एकत्र जोडणे : वन्यजीव संरक्षणामध्ये डिजिटल तंत्र नावीन्यपूर्वक वापर' अशी आहे. त्याचे औचित्य साधून सांगली वन विभागाने जिल्हास्तरीय नियोजन समितीकडून मिळालेल्या निधीतून वन्यजीव रक्षणासाठी डिजिटल तंत्रज्ञानाधारित साहित्य, उपकरणे खरेदी केली आहेत.

लोकवस्तीत आलेल्या प्राण्यांच्या बचावासाठी, जंगलातील घुसखोरी, जंगलातील आगी, जखमी वन्य प्राणी यांवर नियंत्रण/लक्ष ठेवण्यासाठी रात्रीच्या वेळी वापरासाठी थर्मल ड्रोन, रात्री अथवा दिवसा गवतात, पिकात लपलेल्या वन्य प्राण्यांची हालचाल शारीरिक तापमानाची नोंद घेऊन टिपण्यासाठी थर्मल इमेज फाइंडर, वन्य प्राण्यांची मोजणी, वावर, भ्रमणमार्गांची नोंद घेण्यासाठी, जखमी वन्य प्राण्यांवर लक्ष ठेवणे, पशुधनावर हल्ला झाल्यावर हल्ला करणारा प्राणी ओळखणे आदी कामांसाठी ट्रॅप कॅमेरा, वॉकी-टॉकी आदी उपकरणांचा नव्या खरेदीत समावेश आहे.

जखमी प्राणी उपचार व बचाव याबाबत नोंदी ठेवण्यासाठी इंटरनेटद्वारे स्वतंत्र प्रणाली, वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानाची त्वरित भरपाई देण्यासाठी ऑनलाईन प्रणाली तयार करण्यात आल्या आहेत. अभयारण्याबाहेरील प्राण्यांवर नियंत्रण राखण्यासाठी व उपाययोजना करण्यासाठी त्यांच्या हालचालींची नोंद करून डिजिटल मॅप तयार करण्यात येत आहेत. राज्यातील वन्यजीवांसंदर्भातील गुन्ह्यांच्या डिजिटल नोंदी केल्या जात आहेत, असे विविध उपक्रम वन विभाग राबवत आहे.



**स्रोत** – शिवाजीराव चौगुले. 'आता वन्यजीव रक्षणासाठी
डिजिटल तंत्राचा होणार वापर; प्राण्यांच्या
हालचालींवर राहणार लक्ष', *www.esakal.com*,
०५.०३.२०२४.

## कोकण

### रत्नागिरी जिल्ह्यात १८ वर्षांत वन्य प्राण्यांचे २ हजारांपेक्षा जास्त व्यक्तींवर हल्ले

रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या १८ वर्षांत वन्य प्राण्यांकडून पाळीव प्राण्यांवर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याचे वन विभागाच्या आकडेवारीत दिसून आले आहे.

२००६ ते २०२४ या १८ वर्षांच्या काळात २,९०८ नागरिकांवर वन्य प्राण्यांनी हल्ले केल्याची व शेतीच्या नुकसानाची नोंद झाली आहे. यामध्ये २६ जणांवर बिबट्याच्या हल्ल्यांचे प्रसंग ओढवले. गवा आणि डुकराच्या हल्ल्यांच्या दोन घटनांमध्ये प्रत्येकी एका व्यक्तीचा मृत्यू झाला. वन विभागामार्फत अशा

नुकसानग्रस्तांना आतापर्यंत २ कोटी ४२ लाख ४९ हजार रुपये भरपाईदाखल देण्यात आले आहेत.

२००६ ते २०२३ नोव्हेंबर या काळात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात पशुधन गमावलेल्या पशुपालकांना नुकसानभरपाईपोटी १ कोटी ५७ लाख ३५ हजार रुपये शासनाने दिले. याच कालावधीत वन्य प्राण्यांकडून पिकांच्या हानीचा फटका ६०८ शेतकऱ्यांना बसला. त्यांना सुमारे ३८ लाख ६९ हजार रुपये नुकसानभरपाई शासनाने दिली. २०१९-२० ते २०२३-२४ नोव्हेंबर अखेरपर्यंत एकूण २६ जणांवर वन्य प्राण्यांकडून गंभीर ते किरकोळ स्वरुपाचे हल्ले झाले. अशा घटनांमध्ये जखमींना सुमारे ४६ लाख ४५ हजार रुपये मदत म्हणून देण्यात आले.

२०१९-२० या वर्षात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांना अथवा मृत व्यक्तीच्या कुटुंबाला अशी १६ लोकांना ७ लाख १५ हजारांची आर्थिक मदत दिली. २०२०-२१ मध्ये ६ जणांना ४ लाख १० हजारांची, २०२२-२३ या वर्षी ३ जणांना ३३ लाख ९५ हजारांची अन् २०२३-२४ ला एका जखमीला १ लाख २५ हजारांची मदत दिली.

**स्रोत** – ‘१८ वर्षांत वन्य प्राण्यांचा २,००० जणांवर जीवघेणा हल्ला; बिबट्याच्या तावडीत सापडले २६ जण’, *www.esakal.com*, ०९.०१.२०२४.

## रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवर यंदा कासवांच्या अंड्यांच्या संख्येत ३ हजारांची वाढ

रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यातील माडबन, वेत्ये इथल्या समुद्र किनाऱ्यांवर ऑलिव्ह रिडले कासवांची घरटी व अंड्यांमध्ये २०२३ च्या तुलनेत यंदा वाढ झाली आहे.


गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यापर्यंत इथल्या किनाऱ्यांवर १४ घरट्यांमध्ये १,७१३ अंडी सापडली होती. यंदा ही संख्या ४७ घरटी आणि ४,७९२ अंडी इतकी आहे. दोन्ही ठिकाणी मिळून ३३ घरटी जास्त आणि जवळपास ३,००० अंडी जास्त आढळून आली आहेत.

वेत्ये, माडबनसह जिल्ह्यातील मालगुंड, गावखडी या किनाऱ्यांवर मिळून फेब्रुवारी महिन्यात १८० घरटी मिळाली. त्या मध्ये १८,५०७ अंडी होती. ४० ते ४५ दिवसांनंतर ६८३ अंड्यांमधून कासवाची पिल्ले बाहेर आली. त्यांना समुद्रात सोडण्यात आले.

वन विभागाची गावनिहाय आकडेवारी

| **गाव** | **घरटी** | **अंडी** | **समुद्रात सोडलेल्या पिल्लांची संख्या** |
|---|---|---|---|
| मालगुंड | ३९ | ४००४ | ७० |
| गावखडी | ९४ | ९७११ | ५८८ |
| वेत्ये | २० | १९३८ | २५ |
| माडबन | २७ | २८५४ | ० |
| **एकूण** | १८० | १८५०७ | ६८३ |

गेल्या काही वर्षांपासून राज्य वन विभागाचा कांदळवन कक्ष, स्थानिक वन विभाग आणि कासवमित्र यांच्या पुढाकाराने मोठ्या प्रमाणात कासवांच्या घरट्यांचे संरक्षण आणि संवर्धन केले जात आहे. ज्या किनाऱ्यावर घरटी आहेत त्यांच्या संरक्षणासाठी कांदळवन कक्षाकडून कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अंड्यांच्या संरक्षणाची सोय करण्यासाठी निधीही दिला जातो.
(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ४ अंक ४)



**स्रोत** – ‘माडबन, वेत्ये समुद्र किनारी तब्बल 4 हजार 792 अंड्यांचे संरक्षण; कासवांच्या घरट्यांमध्ये मोठी वाढ’, *www.esakal.com*, ०५.०३.२०२४.
‘महिन्यात समुद्रात झेपावली ६८३ कासवांची पिल्ले; कासवमित्रांकडून १८० घरट्यांचं संरक्षण’, *www.esakal.com,* २९.०२.२०२४.

## माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका/शहर | घटना | स्रोत |
|---|---|---|---|
| अहमदनगर | अहमदनगर शहर | केडगावात बिबट्याच्या हल्ल्यात तीन जखमी; पाच तासांच्या प्रयत्नांती बिबट्या जेरबंद | सकाळ २५.०२.२०२४ |
| नाशिक | इगतपुरी | त्रिंगलवाडी, कावनईसह घोटीतही बिबट्याची धास्ती; वन विभागाचे बिबट्याला पकडण्याचे प्रयत्न अयशस्वी | सकाळ ०१.०३.२०२४ |
| | नाशिक | पाथर्डी, पिंपळगाव खांब परिसरात बिबट्या जेरबंद | लोकसत्ता २९.०३.२०२४ |
| | | देवळाली कॅम्प परिसरात दोन महिन्यांत तिसरा बिबट्या जेरबंद | लोकसत्ता १२.०३.२०२४ |
| | निफाड | मुंबई आग्रा महामार्गावर कोकणगावात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार | सकाळ १७.०३.२०२४ |
| | सिन्नर | मापारवाडी शिवारातील विहिरीत बिबट्या पडला; रात्रभर विहिरीत अडकलेल्या बिबट्याची वन विभागाकडून सकाळी सुटका | महाराष्ट्र टाइम्स १३.०३.२०२४ |
| पालघर | मोखाडा | मोखाड्यात बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी | सकाळ १७.०३.२०२४ |
| पुणे | आंबेगाव | पारगावात बिबट्याच्या हल्ल्यात पाच मेंढ्या ठार | लोकमत २०.०४.२०२४ |
| | जुन्नर | उंब्रज इथे बिबट्याच्या हल्ल्यात चार वर्षांचे मूल जखमी | सकाळ ११.०३.२०२४ |
| | | उंब्रज इथे वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात सलग दुसऱ्या दिवशी दुसरा बिबट्या जेरबंद | सकाळ १६.०३.२०२४ |
| | | नारायणगावात बिबट्याच्या हल्ल्यात दोन दुचाकीस्वार जखमी; महिनाभरातील दुसरी घटना | सकाळ १८.०२.२०२४ |
| | | शिरोली खुर्द इथे धनगरवाड्यातून दीड वर्षांच्या मुलीला बिबट्याने उचलून नेले | महाराष्ट्र टाइम्स १२.०४.२०२४ |
| | हवेली | मौजे वडगाव शिंदे इथे मृत बिबट्याच्या अवयवांची चोरी; वन विभागाकडून गुन्हा दाखल | लोकसत्ता ११.०२.२०२४ |
| वर्धा | सेलू | बोर व्याघ्र राखीवच्या बफर क्षेत्रात रेहकी गावात दोन दिवसांत बिबट्याच्या हल्ल्यांत चार वासरे ठार | लोकसत्ता ०४.०३.२०२४ |
| वाशिम | मानोरा | भुली परिसरात बिबट्या विहिरीत पडला; वन विभागाने केली सुटका | लोकमत २७.०४.२०२४ |



## राष्ट्रीय बातम्या

### देशात बिबट्यांच्या संख्येत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर; राज्यातील ७५% बिबटे संरक्षित क्षेत्राबाहेर

केंद्रीय वन, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयाने १ मार्च रोजी देशातील संरक्षित क्षेत्रांतील बिबट्यांच्या गणनेचा अहवाल प्रकाशित केला. बिबट्यांच्या सर्वाधिक संख्येत मध्य प्रदेश पहिल्या स्थानी असून महाराष्ट्र दुसऱ्या आणि कर्नाटक तिसऱ्या स्थानावर आहे.

अहवालानुसार देशातील संरक्षित वन क्षेत्रांमध्ये बिबट्यांची संख्या अंदाजे १३,८७४ आहे. बिबट्यांच्या गणनेचा हा अहवाल 'राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण' (नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथॉरिटी), 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' यांनी राज्यांच्या वन विभागांच्या मदतीने तयार केला आहे.

महाराष्ट्रातील संरक्षित वन क्षेत्रांमध्ये बिबट्यांची संख्या अंदाजे १,९८५ आहे. २०१८ साली ही संख्या १,६९० होती. त्या संख्येत १२२ बिबट्यांची भर पडली आहे. राज्यातील बिबट्यांच्या एकूण संख्येपैकी जवळपास ७५% बिबटे संरक्षित क्षेत्राबाहेर राहात असल्याचे अहवालात म्हटले आहे. राज्यातील व्याघ्र राखीव क्षेत्रांतील बिबट्यांच्या अधिवासाची घनता २०१८ च्या तुलनेत वाढली आहे, असे अहवालात म्हटले आहे.

बिबट्यांची राज्यनिहाय आकडेवारी

| राज्य | संख्या | राज्य | संख्या |
|---|---|---|---|
| मध्य प्रदेश | ३,९०७ | उत्तराखंड | ६५२ |
| महाराष्ट्र | १,९८५ | उत्तर प्रदेश | ३७१ |
| कर्नाटक | १,८७९ | तेलंगणा | २९७ |
| तमिळनाडू | १,०७० | बिहार | ८६ |
| छत्तीसगड | ७२२ | झारखंड | ५१ |
| राजस्थान | ७२१ | | |

**स्रोत** – 'देशातील बिबट्यांच्या संख्येत वाढ; मध्य प्रदेश प्रथम, तर महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी', *www.esakal.com*, ०१.०३.२०२४.

### यंदा मार्च अखेरीस देशात किमान ६०० वणवे – FSI

वर्ष २०२३ मध्ये वणव्यांची संख्या कमी झाल्याच्या बातम्या (पान क्र. 7 व 12) असतानाच यंदा मात्र वणव्यांचे प्रमाण वाढल्याचे वृत्त आहे. मार्च अखेरीस देशात किमान ६०० ठिकाणी वणवा लागलेला असल्याची नोंद झाली आहे. त्यामध्ये मध्य आणि दक्षिण भारतातील वनांमध्ये तीन दिवसांपेक्षा जास्त काळ जळत असलेल्या वणव्यांची संख्या ३० आहे. भारतीय वन सर्वेक्षण (FSI) च्या वणव्यांची तात्काळ नोंद घेण्यासाठी असलेल्या संकेतस्थळावर ३० मार्च रोजी या नोंदी झाल्या आहेत.

महाराष्ट्रात सर्वाधिक वणव्यांची नोंद झाली असून त्या पाठोपाठ वणव्यांच्या संख्येच्या उतरत्या भाजणीत आंध्र प्रदेश, तेलंगण, ओदिशा आणि छत्तीसगढचा क्रमांक आहे. मोठ्या वणव्यांची संख्या आंध्र प्रदेशात सर्वाधिक असून दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र आहे.

महाराष्ट्रात १३४ वणवे असून त्यापैकी सहा वणवे मोठे म्हणजे तीन दिवसांपेक्षा जास्त काळ जळत आहेत. आंध्र प्रदेशात ९४ वणवे जळत असून त्यातील आठ वणवे मोठे आहेत. तेलंगण आणि ओदिशात वणव्यांची संख्या अनुक्रमे ८२ व ६३ तर मोठे वणवे अनुक्रमे पाच व दोन आहेत.

अमेरिकी अंतराळ संशोधन संस्था 'NASA' च्या उपग्रह प्रणालीतही मार्चच्या शेवटच्या आठवड्यात भारतात मध्य, पश्चिम व दक्षिण भागात वणव्यांची नोंद झाली आहे. देशातील बहुतांश वणवे हे मानवनिर्मित असल्याचे अभ्यासांती दिसून आले आहे. असे मानवनिर्मित वणवे टाळणे शक्य असल्याचे वृत्तात म्हटले आहे.

**स्रोत** – जितेंद्र चौबे. 'Forest fires rage across the country at 600-plus points as mercury begins to climb', *www.newindianexpress.com*, ३१.०३.२०२४.

# आंतरराष्ट्रीय बातम्या

## वन्यजीव गुन्ह्यांच्या तपासासाठी भारतासह पाच आशियाई देश एकत्र येणार

वन्यजीव गुन्हेविषयक गोपनीय माहितीची देवाणघेवाण व या गुन्हेगारांच्या आर्थिक स्त्रोतांचा बिमोड करून आपापल्या क्षेत्रांतून होणारी ही तस्करी रोखण्याचा एकत्रित प्रयत्न भारत, बांगलादेश, थायलंड, मलेशिया आणि इंडोनेशिया हे देश करणार आहेत. भारताची केंद्रीय गुप्तचर यंत्रणा (CBI) आणि 'इंटरपोल'तर्फे फेब्रुवारी महिन्यात आयोजित दोन दिवसीय बैठकीत हा निर्णय झाला.


या बैठकीत विदेशी प्रजातींच्या तस्करीबाबत सखोल चर्चा झाली. या तस्करीसाठी मालवाहतूक विमानसेवेचा अधिक वापर केला जातो. तसेच, आफ्रिकेतून प्रथम आग्नेय आशिया आणि तिथून भारत व चीन हा या तस्करीचा मुख्य मार्ग आहे. या मुख्य मार्गाशिवाय वन्यजीवांची तस्करी प्रामुख्याने कोणत्या भागांतून करण्यात येते ते चार भागही बैठकीत झालेल्या चर्चेत लक्षात घेण्यात आले. आफ्रिका ते आग्नेय आशिया व तिथून बांगलादेश (मालवाहतूक विमानसेवा), मलेशिया व इंडोनेशिया इथून चीन (खुष्कीच्या मार्गाने), मलेशिया व थायलंडमार्गे भारत (विमानसेवा) आणि थायलंड ते भारत (म्यानमारची सीमा ओलांडून) हे तस्करीचे चार प्रमुख मार्ग आहेत.

वन्यजीव पाळू नयेत; त्यांच्यापासून माणसांमध्ये नव्या विषाणूंचा संसर्ग होण्याची शक्यता असते. तसेच, विदेशी प्रजाती अन्य अधिवासात वेगळ्या प्रकारे वाढू-फोफावू शकतात, त्यामुळे अधिवासांतील मूळ प्रजातींच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. या बाबींकडे बैठकीच्या निमित्ताने वृत्तात पुन्हा लक्ष वेधले आहे.

**स्रोत** – 'वन्यजीव तस्करी रोखण्यासाठी मोठा निर्णय, तस्करांविरोधात 'हे' पाच देश करणार कारवाई', *https://marathi.indiatimes.com*, २५.०२.२०२४.


**NEW!**
**THE GREAT NICOBAR BETRAYAL**
A Frontline Publication,
Curated by Pankaj Sekhsaria,
pg. xii+100+12 colour plates; Price: Rs. 499

----




An edited collection of short pieces by different writers, important documents and a selection of pictures on the mega infrastructure project being pushed aggressively in Great Nicobar Island. This is a project that will impact half a dozen protected areas, a rich coastline, endangered and endemic biodiversity and ancient communities that have been living here for thousands of years.

---

Articles by Pankaj Sekhsaria, Aathira Perinchery, Janki Andharia, V Ramesh & Ravinder Dhiman, B Chaudhari, Ishika Ramakrishna, Uday Mondal, Mahi Mankeshwar, Shrishtee Bajpai, S Harikrishnan, Manish Chandi, Ajay Saini, and Norma Alvares.

Foreword by: Madhav Gadgil


---


Pls write to psekhsaria@gmail.com to order copies and/or for further information.


BOOKS FROM THE *PA UPDATE*


1) *Conservation Kaleidoscope: People, Protected Areas and Wildlife in Contemporary India*, 2021, 450 pp, 140 line drawings., Price: 650
2) *The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra: News and Information from the Protected Area Update 1996-2015,* 2019. 250 pp, 100 line drawings, Price: Rs. 400
3) *The State of Wildlife in North-East India 1996-2011: A compilation of news from the Protected Area Update,* 2013, 330 pp, 100 line drawings, Price: Rs. 300

**For more details and to order copies, please write to psekhsaria@gmail.com**



**Support the *PA Update***

We continue to need financial support to sustain the publishing of the PA Update. Please considering donating for the same or subscribing for yourself, your institutions or gifting subscriptions. For further details please write to psekhsaria@gmail.com

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## निवडणुका, मतदार आणि वन्यजीव वगैरे

निवडणुकीच्या काळात पक्ष आणि नेते विविध विषयांवर आपल्या भूमिका मांडतात, जाहीरनामे प्रसिद्ध करतात. मात्र या जाहीरनाम्यांत मानवी आयुष्य आणि भविष्यासाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या पर्यावरणाला नगण्य स्थान आहे. परीक्षेच्या अभ्यासक्रमात एखादा विषय 'ऑप्शन'ला टाकावा तसा पर्यावरण आणि वन संवर्धन हा विषय राज्यकर्ते किमान निवडणुकीत तरी 'ऑप्शन'ला टाकतात. कारण, वन्यजीव हे त्यांचे मतदार नाहीत. तसेच, वन्यजीवाविषयी काळजी असणारे पर्यावरणप्रेमी, पर्यावरणवादीही तसे संख्येने कमीच आहेत, त्यामुळे तेही 'मतपेढी' नसतात.

गेल्या १० वर्षांत, केंद्रातील सरकारने आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय मंचांवर आपली प्रतिमा 'हवामान बदलाविषयक भूमिकेत जगाचे नेतृत्व करु शकणारे राष्ट्र' अशी बनवली आहे. भारताने, सौर ऊर्जा, स्वच्छ ऊर्जा, वन्यजीव संवर्धन अशा क्षेत्रांत बऱ्याच अंशी प्रगती केली आहे, असे आकडेवारी सांगते. मात्र, याच सरकारने आणलेले पर्यावरण, वनविषयक कायदे, असमाधानकारक आणि वन्यजीवांसाठी, एकूणच पर्यावरणासाठी धोकादायक आहेत, असे पर्यावरणतज्ञांचे म्हणणे आहे. गेल्या १० वर्षात जगाशी स्पर्धा करतांना पुढे जाण्याची झालेली घाई, या सगळ्यांत, जरा थांबून, पर्यावरण, वन्यजीवांकडे बघायला कोणालाच फुरसत नाही. त्यामुळे अनेक विकासकामे करताना वन्यजीवांकडे दुर्लक्ष झालेले दिसत आहे. महाराष्ट्रात समृद्धी महामार्ग हे याचे मोठे उदाहरण आहे.

देशात २००४ ते २०१४ या १० वर्षांच्या काळात तत्कालीन केंद्र सरकारने देशात पर्यावरण, वन्यजीव संवर्धनाबाबत अनेक उत्तम प्रागतिक कायदे केले. पर्यावरणविषयक ठोस भूमिकाही घेतल्या. मात्र, नंतरच्या काळात, या कायद्यांचा उपयोग विकासकामे थांबवण्यासाठी किंवा त्यासाठीचे शस्त्र म्हणून केला गेला, एकूणच त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे या कायद्यांविषयी सर्वसामान्य लोकांच्या मनात नकारात्मक भावना आहे.

खरे तर, वन्यजीव संवर्धन हे माणसाचे निसर्गावर उपकार नाहीत, तर ती मानवी अस्तित्वासाठीची गरज आहे. हे लक्षात घेऊन राजकीय पक्षांनी, धोरणकर्त्यांनी पर्यावरण, वन्यजीव संवर्धनावर लक्ष केंद्रीत करायला हवे. आवश्यक तिथे , राजकीय लाभ किंवा लोकानुनय न बघता कठोर भूमिका घ्यायला हव्यात. पर्यावरणवादी कार्यकर्ते, संघटना यांनी परस्परांशी समन्वय ठेवून आपली एकत्रित शक्ती वाढवायला हवी. तसेच, राज्यकर्त्यांशी फटकून न वागता, समन्वय साधण्याची गरज आहे. दुसरे म्हणजे, पर्यावरण, वन्यजीव संवर्धनाच्या नावाखाली कुठलेही छुपे अजेंडे चालवू नयेत. तिसरे म्हणजे, वैज्ञानिक दृष्टीने आणि भारताच्या पर्यावरणाचा, भौगोलिक परिस्थिती आणि गरजा यांच्या संदर्भात अभ्यास केला पाहिजे. त्यात परदेशी मानकांशी तुलना नको. देशी विचार अधिक उपयुक्त ठरेल.

पर्यावरण आणि वन्यजीव संवर्धन हा सर्वसामान्य लोकांसाठी किचकट विषय असतो कारण लहानपणापासून त्याचे महत्त्व वैज्ञानिक दृष्टीने आपल्याकडे शिकवले जात नाही. तशीही भारताची सामाजिक संवेदनशीलता कमीच आहे, त्यामुळे, जे मोर्चे काढत नाहीत, मतदान करत नाहीत, मागण्या करत नाही, अशा मुक्या प्राण्यांचा विचार करण्याची सामूहिक प्रगल्भता आपल्याकडे नाही. म्हणूनच, हा विषय खूप संयम ठेवून हाताळावा लागणार आहे. निवडणूक हे त्याचे साधन होऊ शकत नाही. पण या निमित्ताने जनजागृती नक्की होऊ शकते.

- **राधिका अघोर**
पत्रकार व पर्यावरणप्रेमी
renughadyalpatil@gmail.com

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004